महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे

"न्यु वेस्टव्यू"
गजानन महाराज मंदिराजवळ,
राम मारुती रोड,
ठाणे (प) ४०० ६०२.
दुरध्वनी क्रमांक- २५३४६५२३,२५३८६४४०
Email id-supdtest.th-mh@gov.in

New Westview,
Behind Gajanan Maharaj Mandir,
Ram Maruti Road,
Thane (W) Pin No. 400 602,
Tel. No. 25346523, 25386440

संदर्भ :- आस्था/धउआ/ 1651 /२०२४ दिनांक 16/08/24

प्रति,
मा.धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
संगणक कक्ष

मार्फत,
मा.धर्मादाय सह आयुक्त,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

विषय :- सुधारित निविदा सूचना संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १.मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र आस्था/निरी-३/२९४/२४ दि.१२/१/२०२४.
२.सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,ठाणे कार्यालयातील बाहययंत्रणेव्दारे शिपाई,पहारेकरी व सफाईगार पदाबाबची दि.१९/०७/२०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव
३.या कार्यालयाचे पत्र आस्था/धउआ/१६१८/२०२४ दिनांक १३/०८/२०२४

मा.महोदय,

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यांत येते की, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे या कार्यालयात पहारेकरी व सफाईगार या पदांची बाहय यंत्रणेव्दारे सेवा उपलब्ध करुन घेणेकरीता सुधारित निविदा सूचना प्रसिध्द करण्यांत आली आहे. सदर निविदा सूचना https://charity.mahatrashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांकरीता यासोबत सादर करण्यांत येत आहे.

आपली विश्वासू,

16/8/24
(रुपाली बे.पाटील)
धर्मादाय उप आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग,ठाणे

सोबत :- वरीलप्रमाणे

३) निविदे सोबत जोडलेले सर्व कागदपत्र साक्षांकित असावेत.

४) उपरोक्त पदाच्या सेवेसाठी प्रत्येक माणसाकरीता आकारण्यात आलेला दर हा किमान वेतन कायदा १९४८ प्रमाणे असावा. तसेच नियमितपणे पदनिर्मिती केली असता जितका खर्च शासनास येईल त्या खर्चाच्या २०% ते ३०% बचत होईल अशा रितीनेप्रत्येक पदासाठी मानधन कंत्राटदाराने ठरवावे.

५) व्यसनाधीन, गुन्हेगारांशी पार्श्वभूमी असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यास नियुक्ती देता येणार नाही. कर्मचारी नियुक्ती पूर्वी अशा कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करुन घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

६) बेशिस्त वर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यास या कार्यालयाने निर्देशित केल्यावर त्वरित काढून टाकावे लागेल.

७) निविदे सोबत नोंदणीकृत ठेकेदार/ संस्था/कंपनी/ एजन्सी शासनमान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे.

८) निविदा धारकास अस्तित्वात असलेल्या अनुषांगिक सर्व कायद्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

९) अंशदान निर्वाह निधी/ भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगारविमा योजनेची रक्कम प्रचलित दरानुसार मुख्य मालक म्हणून या कार्यालयातर्फे आपल्या दरात समाविष्ट करुन त्याचा भरणा संबंधित कार्यालयात या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

१०) उपरोक्त पदांना साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील. परंतु कार्यालयीन आवश्यकतेनुसार ज्यादाची सेवा पुरविणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील.अतिरिक्त देयक अदा करण्याची जबाबदारी कार्यालयाची नसेल.

११) सदरील कर्मचाऱ्यांना अपघात झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कर्मचाऱ्याकडून कार्यालयास/ इतरास नुकसान झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१२) नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यास मिळणारे कोणतेही फायदे कंत्राटी कर्मचाऱ्यास देय असणार नाही.

१३) कुठलेही कारण न देता कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार धर्मादाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग ठाणे यांना असतील.

१४) ठेकेदार/कंपनी/संस्थेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

१५) निविदा मंजूर झाल्यास कंत्राटदारास या कार्यालयाशी करार करावा लागेल.

१६) उपरोक्त दोन्ही पदाचे निविदा देत असताना मा. धर्मादाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग,ठाणे यांच्याकडे सिलबंद लिफाप्यात दि.३०/०८/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सादर करावे.

१७) उपरोक्त दोन्ही पदांकरीताच्या स्वतंत्र निविदा लिफाप्यामध्ये सिलबंद करुन त्यावर पदाचे नाव नमूद करुन त्या पदासाठीची निविदा असे नमूद करणे आवश्यक आहे.

१८) सदरील निविदा सूचना https://charity.maharahstra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

16/8/24
सही/-

( रुपाली हे.पाटील )
धर्मादाय उप आयुक्त,ठाणे
विभाग, ठाणे